प्रेस नोट दिनांक. १५/०४/२०२४

**आरोपी लोकसेवक संजय सिताराम मुंढे, वय ५५ वर्षे, पद - सहायक पोलीस उप निरीक्षक,पो.स्टे.नवामोंढा जि. परभणी १०,०००/- रूपयांची लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | संजय सिताराम मुंढे, वय ५५ वर्षे, पद सपोउपनि नेमुणक पोलीस स्टेशन नवामोंढा,परभणी ( वर्ग ३) गृह विभाग |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रू. |
| लाचेची स्विकारली रक्कम | १०,०००/- रू. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे भावजी (बहिणीचे पती) यांना गंगाखेड येथे दि. ०४/०४/२०२४ रोजी झालेल्या मारहाणीमध्ये ते बेशुद्ध झाल्याने त्यांना परभणी येथील पार्वती अंभोरे हॉस्पिटल मध्ये उपचार करिता दाखल करण्यात आले होते. त्यावरून संबंधित डॉक्टरांनी पोलीस स्टेशन नवामोंढा येथे MLC घेणे बाबत कळविले होते. तक्रारदार यांचे भावजी हे शुध्दीवर नसल्याने व त्यांचे तोंडाला क्लिप लावलेली असल्याने MLC जबाब नोंदवता आला नाही.<br>दि.१२/०४/२०२४ रोजी आलोसे संजय मुंढे हे पो.स्टे.नवामोंढा,परभणी येथून MLC जबाब घेणे करिता आले. तक्रारदार यांचे भावजीला बोलता येत नसल्याने त्यांनी लेखी तक्रार दिली असता आलोसे संजय मुंढे यांनी लेखी तक्रार जमत नाही असे म्हणून सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचा जबाब नोंदवला आणि तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. आलोसे संजय मुंढे यांना लाचेची रक्कम दिली नाही तर ते पोलीस स्टेशन गंगाखेड येथे MLC जबाब पाठवणार नाहीत. म्हणून त्यावेळी नाईलाजास्तव तक्रारदार यांचे भावजीच्या भावाने आलोसे संजय मुंढे यांना ५,०००/- रु दिले.<br>त्यानंतर आलोसे संजय मुंढे यांनी दि.१५/०४/२०२४ रोजी तक्रारदार यांना फोन करून म्हणाले की, '' मी तुमच्या भावजीच्या MLC जबाब चांगला नोंदविला आहे. तुम्ही मला येऊन भेटा. तुम्हाला आणखीन पैसे द्यावे लागेल'' असे म्हणून लाचेची मागणी करत असल्याची तक्रार एसीबी परभणी येथे दि.१५/०४/२०२४ रोजी प्राप्त झाली.<br>दि.१५/०४/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे संजय मुंढे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना त्यांच्या भावजीच्या MLC जबाबचे केलेल्या कामाबद्दल आणखी १०,०००/- रु लाचेची मागणी केली.<br>त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी येथील पोलीस चौकी मध्ये आलोसे संजय मुंढे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडून १०,०००/- रु लाचेची रक्कम स्विकारली आहे.पो.स्टे. नानलपेठ येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी चे पोलीस उप अधिक्षक श्री. अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक श्री.सदानंद वाघमारे, पोह/निलपत्रेवार, पोशि/कदम, पोशि/ बेदरे, चापोह/कदम, नरवाडे यांनी पार पाडली. |
| तपास अधिकारी | श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि युनिट,परभणी. |

**लावलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :– 02452–220597 टोल फ्री क्रमांक:– 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Instagram : acbparbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |


पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी